महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

दु. क्र. (का.) २६४७४२११, २६४७२१३१
रोड, (वै.) २६४७८२५२
फॅक्स : ०२२.२६४७२९३७

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१

Email : cedist@mahadiscom.in

क्र. मु.अ.(वितरण)/डी-३/परिपत्रक /२२१९७ **दिनांक :२० मे २००८**

विषय :- नवीन सेवाजोडण्या देण्याकरीता व क्षमतावाढ करण्याकरीता मार्गदर्शक सूत्रे.

संदर्भ :- १) म.वि.नि.आयोगाने प्र. क्र.७०/२००५ मध्ये (आकारणी अनुसूचीबाबतीत) दिलेला आदेश, दिनांक ८ सप्टेंबर २००६.
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पी आर -३/कासं/३४५८७ दि.२७.०९.२००६.
३) मा.सर्वोच्च न्यायालयाचे क्र.२०३४० /२००७ प्रकरणी आदेश.
४) म.वि.नि.आयोगाने आदेश प्र. क्र.५६ / २००७ मध्ये दिलेले आदेश, दिनांक १६ फेब्रुवारी २००८.

नवीन सेवाजोडण्या देण्याकरीता आणि वाढीव मागणीकरीता विद्युत अधिनियम, २००३ चे कलम ४६ खाली आणि त्यामध्ये तयार करण्यात आलेले विनियम यानुसार करावयाच्या आकारणीच्या कार्यपध्दतीविषयी स्पष्टीकरण करण्याची आणि आकारणीमध्ये सुसूत्रता आणण्याची आवश्यकता होती. ग्राहकांनी आमच्याकडे आणि आयोगाकडे विनंतीअर्ज करुन असे निदर्शनास आणून दिले आहे की, क्षेत्रिय कार्यालये आयोगाचे (विद्युत पुरवठा संहिता आणि वीज पुरवठयाच्या शर्ती) विनियम ३.३.३ आणि ३.३.४ खाली समर्पित वितरण सुविधा (DDF) आणि वीज पुरवठा विस्तार याबाबतीत नियमांचा निरनिराळा अर्थ लावतात, परिणामी ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण होतो व ते अडचणीत येतात. म्हणून संपूर्ण राज्यात नवीन सेवाजोडणी देणे आणि वीज पुरवठा विस्तार करणे याबाबतीत क्षेत्रीय अभियंत्यांनी एकसमान कार्यपध्दती अनुसरावी आणि भावी ग्राहकांना नवीन सेवाजोडणीसाठी येणा-या अडचणी दूर केल्या जाव्यात याकरीता मा. सर्वोच्च न्यायालय आणि महाराष्ट वीज नियामक आयोग यांच्याकडे प्रलंबित असलेल्या कामकाज प्रकरणी अंतिम निर्णयास अधीन राहून पुढील प्रमाणे मार्गदर्शक सुत्रे तयार करण्यात आली आहेत :

अ. क.	तपशील	आकारणी
१.	१.१ जेथे ५०० केव्हीए पेक्षा कमी भार असेल आणि वीज पुरवठा करावयाची ठिकाणे अ आणि ब क्षेत्रातील असतील असे लघु दाब बिगर घरगुती, लघु दाब घरगुती ग्राहक किंवा बिगर घरगुती निम्न दाब ग्राहकांचा गट आणि निवासी संकुले.	(अ) सर्व पायाभूत सोयी म.रा.वि.वितरण कंपनी निर्माण करुन देईल आणि माननीय महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने ८ सप्टेंबर २००६ च्या आदेशात (प्र.क्र.७०/२००५) मान्यता दिलेल्या आकारणी अनुसूचीप्रमाणे वीज देयकामध्ये वसुली करण्यात यावी.
	१.२ लघु दाबाचे सर्व कषी ग्राहक	(ब) ग्राहक / ग्राहक समूह यांना लवकरात लवकर सेवाजोडणी पाहिजे असेल आणि ते काम करुन घेण्यास व पायाभूत सोईंचा खर्च सोसण्यास तयार असतील तर पायाभूत सोईच्या खर्चाचा परतावा वीज देयकांमध्ये त्या रकमेचे समायोजन करुन द्यावयाचे आहे.
	१.३ लघु दाबाचे सर्व औद्योगिक ग्राहक वैयक्तिक आणि समूह	(क) संकूल / संकूले यांना भार जोडून देतेवेळी तेथे वितरण रोहित्र स्थापन करणे आवश्यक असेल तर विकासकाने कंपनीला असे रोहित्र स्थापन करण्यासाठी सोईंची निर्मिती आणि जनतेच्या उपयोगाकरीता राखून ठेवलेल्या जागेपैकी जमीन विनाआकारणी तत्वावर उपलब्ध करुन दिली पाहिजे.
२.	'क' क्षेत्रातील, ५०० केव्हीए पेक्षा कमी भार असणारे लघु दाब बिगर घरगुती, कमी दाब घरगुती ग्राहक, ग्राहक किंवा बिगर घरगुती लघु दाब ग्राहकांचा गट आणि निवासी संकुले	(अ) ग्राहकांना पुढीलप्रमाणे विकल्प उपलब्ध असेल : समर्पित वितरण सुविधा (डीडीएफ) म्हणून सेवाजोडणी घ्यावी आणि सर्व खर्च सोसावा. अशा प्रकरणी, तो तारमार्ग त्या ग्राहकांसाठीच असेल, किंवा (ब) नॉन- डीडीएफ प्रकाराने सेवाजोडणी घ्यावी आणि जमिनीच्या किंमती व्यतिरिक्त पायाभूत सोईचा सर्व खर्च सोसावा. वीज देयकामध्ये समायोजन करण्याद्वारे त्या खर्चाचा परतावा देण्यात येईल. अशा प्रकरणी, निर्माण केलेल्या पायाभूत सोयी केवळ त्या ग्राहकांसाठीच असणार नाहीत.

३.	५०० केव्हीए समान किंवा त्याहून अधिक भार असेल असा लघु दाब बिगर घरगुती ग्राहकांचा गट, निवासी संकुल.	साधरणपणे, ५०० केव्हीए किंवा त्याहून अधिक भार हा निवासी / अन्य संकुलांची वीज पुरवठयाची गरज पूर्ण करण्यासाठी केवळ त्यांच्याकरीता वीजजाळे (डेडीकेटेड नेटवर्क) उभारुन घेण्यात येतो. त्यापैकी अनेक प्रकरणी पायाभूत सोई (रोहित्र, तारमार्ग आणि इतर संलग्न उपकरणे इत्यादी) खुद्द विकासकाच्या जागेतच उभाराव्या लागतात आणि केवळ त्यांच्याच उपयोगासाठी असतात. यास्तव, विकासक अथवा ग्राहक गट यांना डीडीएफखाली सेवाजोडणी देण्यात यावी - जिच्या अंतर्गत, ३३/११ केव्ही किंवा २२/११ केव्ही उपकेंद स्थापना / क्षमता वाढ याकरिता लागणा-या खर्चाचा समावेश असणार नाही. अशा ग्राहकांबाबतीत संबंधित तारमार्ग केवळ त्यांच्यासाठीच असेल. अशा संकुलांची भार मागणी ३ एमव्हीए अथवा त्याहून अधिक असेल तर अशी भार मागणी पूर्ण करण्याकरीता ३३/११ के.व्ही. किंवा २२/११ के.व्ही क्षमतेचे उपकेंद उभारण्यात येईल आणि उपकेद व संलग्न सुविधा यासाठीचा खर्च म.रा.वि.वि.कंपनी कडून करण्यात येईल. उपकेंदासाठी लागणारी जमीन, संकुलामध्ये सुखसोई व सार्वजनिक उपयोगाकरीता राखीव ठेवलेल्या जागेमधून विकासकाने विना आकारणी तत्वावर उपलब्ध करुन द्यावयाची आहे. अशा प्रकरणी, उपकेंद उभारणीचा व तारमार्ग टाकण्याचा खर्च वितरण कंपनी करणार असल्यामुळे ते उपकेद / तारमार्ग याद्वारे अन्य ग्राहकांना वीज पुरवठा देण्याची मुभा कंपनीस राहील. तथापि, संकुलातील उपकेंद हे केवळ त्या संकुलास वीज पुरवठा करण्यासाठीच असावे अशी विकासकाची इच्छा असेल तर समर्पित वितरण सुविधेअंतर्गत त्याने उपकेंदाची उभारणी करुन घ्यावी व त्यासाठीचा खर्च सोसावा.अशा प्रकरणी ते उपकेद केवळ त्या संकुलासाठीच असेल आणि अन्य ग्राहकांना त्या उपकेंदातून वीज जोडण्या देण्यात येणार नाहीत.

जास्तीत जास्त संख्येने नवीन ग्राहकांना वीज पुरवठा करण्याकरीता उपलब्ध पायाभूत सोयीसमोर नव्याने उपलब्ध कराव्या लागणा-या पायाभूत सोयींचा विचार करुन खालील प्रमाणे क्षेत्रीय वर्गवारी करण्यात आली आहे.

'अ' क्षेत्र - महापालिका हद्दीत ५ कि.मी. पर्यंत, नगरपालीका हद्दीत २ कि.मी. पर्यंत व ग्रामपंचायत गावठाण हद्दीत १ कि.मी. पर्यंतचा परिसर, तसेच एम आय डी सी क्षेत्रे धरुन.

'ब' क्षेत्र - वरील 'अ' क्षेत्राबाहेरील आणि असमर्पित वितरण सेवेतील ११/२२ के.व्ही. उच्चदाब तारमार्गा पासुन ६०० मीटर्स अंतरापर्यतचा परिसर .

'क' क्षेत्र - वरील 'अ' व 'ब' या क्षेत्रांच्या बाहेरील परिसर.

<u>क्षेत्रीय विदयुतीकरण आणि नवीन वीज जोडण्या देण्याकरीता अनुसरावयाची कार्यपध्दती :-</u>

विदयुत अधिनियम, २००३ चे कलम ४३ खालील सार्वत्रिक वीज पुरवठयाची बांधीलकी पूर्ण करण्यासाठी आणि त्याच अधिनियमाचे कलम ४६ नुसार, तसेच नियामक आयोगाच्या वीज पुरवठा संहिता विनियम, २००५ यानुसार आकारलेल्या रकमेची वसुली करण्यासाठी आणि आयोगाने प्रकरण क्र.७० /२००५ मध्ये दिनांक ८ सप्टेंबर २००६ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन करण्यासाठी पुढील कार्यपध्दती अनुसरण्यात यावी :

१) दारिदय रेषेखालील, तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल आणि'क'क्षेत्रासहित कोणत्याही परिसरात राहणा-या ग्राहकांकरिता महावितरण कंपनीने विशेष योजनांद्वारे पायाभूत सोयी प्राधान्याने निर्माण करुन वीज पुरवठा करावयाचा आहे.

२) मुख्य अभियंते आणि त्यांचे क्षेत्रीय अधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रात होत असलेल्या विकासाचा नियमित व डोळसपणे आढावा घ्यावयाचा आहे आणि सदर परिसरांतील ग्राहकांना वीज पुरवठा देण्याकरीता पायाभूत सोयी निर्माण करण्यासाठी त्यांचा आराखडा व योजना तयार करावयाच्या आहेत आणि वित्तिय संस्थाकडून निधी प्राप्त करावयाचा आहे; तसेच योग्य प्रकरणी करार व साधनसामग्री (नॉन टर्न की करारावर काम करुन घ्यावयाचे असेल तर) अंमलबजावणीसाठी तयार ठेवावी. संभाव्य ग्राहकांकडून वीज पुरवठयाची मागणी केली जाताच सदर योजनाखालील कामे करुन घेण्यात यावीत आणि वीज जोडण्या देण्यात याव्यात. ज्या परीसरात शीघ्र, केंदित आणि मोठया प्रमाणात विकास घडून येत असेल तेथे क्षेत्रीय अधिकारी लगतची भावी मागणी पूर्ण करण्यासाठी उपकेंद उभारणी / क्षमता वाढ यासारख्या मुळापासून निर्माण करावयाच्या पायाभूत सोयींचा आराखडा तयार करुन त्या सोयी निर्माण करतील.

३) सर्व वर्गातील प्रलंबित ग्राहकांची कालानुकमे यादी ठेवण्यात यावी. या यादी व्यतिरिक्त कोणत्याही ग्राहकास किंवा ग्राहक गटास स्वतःच्या इच्छेने अगर पसंतीने सत्वर जोडणी पाहिजे असेल त्यांनी स्वतःच्या खर्चाने कंपनीच्या देखरेखीखाली जोडणी करुन घ्यावी आणि केलेल्या खर्चाचा वीज देयकामधून परतावा पात्र राहील . मात्र अशा ग्राहकाने कंपनीच्या उचित अधिका-यांकडून कामाचे आर्थिक अंदाजपत्रक आणि विनिर्देश प्राप्त केले पाहिजेत; तसेच महावितरण कंपनीचे देखरेख आकार प्रदान करण्याची आवश्यकता नसेल.

४) कृषीपंपांना वीज पुरवठा देण्याची कार्यवाही सध्याच्याच प्रथेप्रमाणे चालू ठेवण्यात यावी. जेणेकरुन, महाराष्ट शासनाने अधिसुचित केलेल्या; कृषीपंपाचा अनुशेष असलेल्या जिल्हयांतील, तसेच अनुशेष नसलेल्या जिल्हयातील, कृषि पंपांना वीज पुरवठा करण्याबाबतीत अनुशेष दूर करणे सुकर होईल. याचा निव्वळ सुपरिणाम म्हणजे, कृषि ग्राहकांना मागणी नुसार वीज पुरवठा देण्यात होईल.

समर्पित वितरण सुविधेकरीता महाराष्ट वीज नियामक आयोगाचे विनियम २००५ मधील कलम ३.३.३ : समर्पित वितरण सुविधेअंतर्गत येणा-या ग्राहकांकडून पायाभूत सुविधेचा पूर्ण खर्च वसूल करण्यात यावा. कार्यालयीन उपयोगाकरिता अशा जोडण्यांचा स्वतंत्र लेखा ठेवण्यात यावा.

या परीपत्रकातील मजकूर क्षेत्रिय कार्यालयातील शाखा अभियंता स्तरापर्यंतच्या सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा. वर नमूद केलेल्या मार्गदर्शक सूत्रांचे उल्लंघन करण्याच्या कृतीची गंभीर दखल घेतली जाईल.

मुख्य अभियंता (वितरण)

प्रत सविनय सादर :

१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या.,
२) संचालक (संचालन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,
३) संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं.मर्या.,
४) संचालक (द.व सु.),म.रा.वि.वि.कं.मर्या.,
५) कार्यकारी संचालक - सांघिक नियोजन /I/II/III/ मानव संसाधन, म.रा.वि.वि.कं.मर्या.,

प्रत सविनय सादर :

१) सचिव (म.वी.नि.आ.), वर्ल्ड टेड सेंटर, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.

प्रत सस्नेह सादर :

१. मुख्य अभियंता वाणिज्य / वीजखरेदी / अंतर्गत सुधारणा/ भार व्यवस्थापन / विशेष प्रकल्प / स्वयंचालित मीटर/ एपीडीआरपी/भांडार/ प्रमुख सल्लागार वितरण फॅन्चायझी
२. मुख्य महा व्यवस्थापक, वित्त व लेखा /तांत्रिक आस्थापना/मुख्य विधी सल्लागार महाव्यवस्थापक, (वित्त भांडवली खर्च)/ निगम लेखा
३. सर्व मुख्य अभियंता (स व सु परिमंडळ), म.रा.वि.वि.कं.मर्या.,
४. सर्व मुख्य अभियंता (स व सु मंडळ), म.रा.वि.वि.कं.मर्या.,

प्रत रवाना :

१ . सर्व कार्यकारी अभियंता / उपविभागीय अधिकारी